एकुण जनरल स्टॅम्प रूपये ....................

# स्थावर मालाचे विक्रीपत्र रूपये ................

मौजा आलोडी, ता.जि. वर्धा, सर्वे नं. १८/१, प्लॉट क्रं. ३१
आराजी १३३.०९ चौ.मी., स्केल क्रं. ................
मुल्यांकनाचा दर रूपये .................... प्रती चौ.मीटर
निर्धारीत मुल्यांकनाप्रमाणे किंमत रू. ........................

**लिहुन घेणार** :- श्री. ........................................
वय ......... वर्षे, धंदा – ...........
रा. ........................................
पॅन क्रं. ................................
मो.नं. .....................................
आधार क्रं. ...............................

**लिहुन देणार** :- **श्री. वसंत विठोबाजी ढवळे,**
वय ८० वर्षे, धंदा – सेवानिवृत्त
रा. गीताई नगर, नागपूर रोड, वर्धा – ४४२००१
पॅन क्रं. ..................................
मो.नं. ....................................
आधार क्रं. ...............................

इसवी सन २०२१ साल कारणे विक्रीपत्राचा लेख लिहुन देतो ऐसाजे की :–

**कारण** : विक्रीपत्र लिहुन देणार हे खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे पूर्णपणे एकमेव मालक असून ही मालमत्ता त्यांचे मर्जीप्रमाणे पाहिजे तसा उपभोग घेणे व वहिवाट, विल्हेवाट, हस्तांतरण करण्याचे त्यांना पूर्ण अधिकार व हक्क आहेत. ही मालमत्ता त्यांना विकावयाची असून विक्रीपत्र लिहुन घेणार यांनी ती विकत घेण्याची ईच्छा त्यांना दर्शविल्यानंतर व सविस्तर चर्चेनंतर लिहुन घेणार यांचे पूर्ण समाधान झाल्यानंतर ते हा खालील वर्णन केलेला प्लॉट विकत घेत आहे, त्याचे वर्णन येणे प्रमाणे :–

**वर्णन** :

आमचे मालकी व कब्ज्यातील स्थावर मिळकत मौजा आलोडी, ता.जि. वर्धा, तलाठी साजा क्रं. २३, र.स.डी. वर्धा व र.डी. वर्धा, ता.जि. वर्धा, ग्राम पंचायत हद्दीतील जि.प. वर्धाचे कक्षेतील सर्वे क्रं. १८/१ एकुण क्षेत्रफळ १.४३ हे.आर. याचे डायव्हर्शन होवुन मंजुर झालेल्या लेआऊट नकाशाप्रमाणे डायव्हर्शन झालेल्या लेआऊट मधील प्लॉट नं. ३१.

मे. उपविभागीय अधिकारी, वर्धा यांना प्रकरण क्रं. ५९, एन.ए.पी. ३४/२०१४-१५, आदेश दिनांक ०१.०३.२०२१ अन्वये निवासी उपयोगाकरिता अकृषक मंजुरी प्राप्त झालेली आहे. तसेच सदर लेआऊट नकाशा नगर रचनाकार, वर्धा यांचे पत्र क्रं. १०७/२०२१, दिनांक १२.०१.२०२१ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

सदरहु मंजुरी प्राप्त असलेला प्लॉट नं. ३१ (एकतीस).

**याची लांबी रूंदी येणेप्रमाणे :-**

लांबी : पूर्व-पश्चिम उत्तर बाजुने १५.७० मी.
पूर्व-पश्चिम दक्षिण बाजुने १५.८० मी.
रूंदी : उत्तर-दक्षिण दोन्ही बाजुने ८.४५ मी.
एकुण क्षेत्रफळ : १३३.०९ चौ.मी. म्हणजेच १४३२.०० चौ.फुट.

**यांची चर्तु:सिमा :-**

**पुर्वेस** : ९.०० मी. रोड.
**पश्चिमेस** : प्लॉट नं. ११
**उत्तरेस** : प्लॉट नं. ३०
**दक्षिणेस** : प्लॉट नं. ३२

येणेप्रमाणे चर्तु:सिमेतील प्लॉट नं. ३१ आम्ही तुम्हांस आजरोजी विकत दिलेला असुन आजरोजी तुमचे मालकी व कब्ज्यात दिलेला आहे, त्याचा भरणा येणेप्रमाणे :-

**भरणा** : रू. /- (अक्षरी रू. फक्त)
आम्हांस तुमचेकडुन .......................... बँक शाखा
व आर.टी.जी.एस. ऑनलाईन ट्रान्सफर द्वारे दिनांक
...................... रोजी प्राप्त मिळाले, ते पावलेत.

--------------

एकुण रू. /- (अक्षरी रू. फक्त)
रूपयाचे मोबदल्यात आम्ही तुम्हांस खालील वर्णन केलेली इस्टेट विकत आहे, सबब -

येणेप्रमाणे भरण्यातील एकुण रक्कम आम्हाला तुमचेकडुन बिनतक्रारी मिळाली असुन भरण्याबद्दल कोणताही उजर राहिलेला नाही व भविष्यात राहणार नाही.

तुमचे मालकी व कब्ज्यास कायदेशिररित्या कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास व ते अन्य तऱ्हेचे लेखाने विल्हेवाट केलेले असुन बोझ्यात नाही, भानगडीत नाही, गहाण वगैरे नाही. तसेच सदर इस्टेटीवर कोणतेही प्रकारचे सरकारी गैर सरकारी, निमसरकारी व खाजगी कर्ज वगैरे घेतलेले नाही. इतर कोणासही कोणतेही प्रकारचा लेख वगैरे करून दिलेला नाही, निघाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आमचेवर राहील व त्यांचे आम्ही तुम्हांस पूर्णपणे निराकरण करून देवु, तुम्हांस तोशिष खर्च लागु देणार नाही व नुकसान भरून देवु.

सदर मिळकत बाबत कोणतेही वाद, विवाद कोणत्याही न्यायालयात न्यायप्रविष्ट नाही, तसेच सदर दस्ताच्या लिखानात कोणत्याही प्रकारची चुक झाल्यास त्याची दुरूस्ती आम्ही तुम्हांस कोणताही आनाकाणी, टाळाटाळ न करता क़ोणताही विना मोबदला करून देवु.

आजपासुन तुम्ही या इष्टेटीचे पूर्णपणे मालक झाले असुन याची तुम्ही आपले नावाने दाखल खारीज करून घ्यावी व आम्ही करून देवु.

आता विक्रीपत्र लिहुन घेणार यांनी सदर मिळकतीचा स्वतंत्रपणे संपूर्ण मालकी हक्काने आपले मर्जीनुसार उपभोग घ्यावा व वहिवाट, विल्हेवाट करावी. तसेच सदर मिळकत हस्तांतरण करणे, किरायाने अथवा लिजवर देणे, बँकेस अथवा वित्तीय संस्थेस अथवा अन्य कोणतेही खाजगी संस्थेकडुन सदर मिळकतीवर कर्ज घेणे, त्यासाठी सदर मिळकत वित्तीय संस्थेस, बँकेस गहाण करून देणे तसेच सदर मिळकतीचे संबंधाने कायद्यानुसार आवश्यक ते सर्व व्यवहार करण्याचे व हस्तांतरणाचे संपूर्ण मालकी हक्क व अधिकार लिहुन घेणार यांना या लेखाने प्राप्त झालेले आहेत.

आता या लेखाद्वारे सदर प्लॉट तुम्ही आपले नावे सर्व संबंधित सरकारी कार्यालयात नोंद करून घ्यावी व आम्ही करून देवु. आतापर्यंतचा सर्व प्रकारचा टॅक्स आम्ही भरला व यापुढील सर्व प्रकारच्या टॅक्सचा भरणा तुम्ही करत जावा.

करिता हा विक्रीपत्राचा लेख आम्ही आपले राजीखुशीने व स्वसंतोषाने कोणत्याही दबावात न येता, कोणतेही नशापाणी न करता पूर्ण शुध्दीवर वर्धा मुक्कामी लिहुन दिलेला असुन तो बरोबर असून आम्हांस आमचे इस्टेट वारसानास लागु व बंधनकारक राहील, वाचून समजून सही केली.

फ.ता. /०६/२०२१

सही – विक्रीपत्र लिहुन देणार

----------------

सही – विक्रीपत्र लिहुन घेणार

**साक्षदार :-**

----------------

१) ------------

२) ------------